# राष्ट्रीय कला मंच
# प्रतिभा संगम
## राज्यस्तरीय विद्यार्थी साहित्य संमेलन

कार्यालय : अ-३, सुविधा स्मिता अपार्टमेंट, ११२५, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

फोन :०२०-२४४३६४०० मो.९४०४८४१५५० ईमेल :pratibhasangamrkm@gmail.com


जा. क्र.:२०२३/प्र. सं./१२

दिनांक: ०५/१०/२०२३

प्रति,

मा. कुलगुरु,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,

पुणे.

सस्नेह नमस्कार,

राष्ट्रीय कला मंच महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने केली 26 वर्ष " प्रतिभा संगम " राज्यस्तरीय विद्यार्थी साहित्य संमेलन आयोजित केले जात आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या लेखनाला प्रोत्साहन मिळावे, मान्यवर साहित्यिकांशी संवाद साधता यावा, यासाठी प्रतिभा संगम हे व्यासपीठ विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले आहे. आतापर्यंत अमळनेर, ठाणे, मुंबई, रत्नागिरी, गोवा, सोलापूर, जालना, लातूर, सांगली अशा विविध ठिकाणी हे साहित्य संमेलन यशस्वीपणे संपन्न झाले आहे. या साहित्य संमेलनामध्ये मधु मंगेश कर्णिक, कवी अशोक नायगावकर, विश्वास पाटील, शांता शेळके, इंदजित भालेराव, प्रवीण दवणे, प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी अशा अनेक मान्यवर साहित्यकांनी सहभाग घेतला व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे.

यावर्षी हे २० वे राज्यस्तरीय साहित्य संमेलन दि. ४ व ०५ नोव्हेंबर २०२३ रोजी हरिभाई देवकरण प्रशाला, सोलापुर या ठिकाणी होणार आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी हे साहित्य संमेलन असल्यामुळे विद्यापीठाने या संमेलनाचे सह-आयोजक व्हावे ही अपेक्षा आहे.

विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या या उपक्रमांसाठी आपण आम्हास सहकार्य कराल, या अपेक्षेसह...

आपला

दुर्गेश साठवणे

निमंत्रक, प्रतिभा संगम २०२३

संपर्क - 9527507494, 9588467310, 9665088197, 8208068853.

**आपणाकडून अपेक्षा:**

❖ साहित्य लिखाणाची आवड असणाऱ्या अधिकाधिक विद्यार्थ्यांना संमेलनास येण्यासाठी उद्युक्त करावे.

❖ आपल्या वाङ्मय मंडळ प्रमुखांना व संबंधित प्राध्यापकांना या संमेलनासाठी विशेष निमंत्रित करीत आहोत, वाङ्मयीन चळवळीबद्दल चर्चा करून काही महाविद्यालयीन उपक्रम ठरवावेत हा त्यामागील हेतू आहे. त्यांचे मार्गदर्शन, सूचना आम्हाला उपयुक्त ठरतील. सहकार्याच्या अपेक्षेसह.

❖ या संदर्भातील परिपत्रक काढून सर्व महाविद्यालयांना **प्रतिभा संगम** विद्यार्थी साहित्य संमेलन विषयात सूचित करण्यात यावे.

❖ **साहित्य प्रकार :**

- कविता (स्वरचित)
- कथाकथन (स्वरचित/ अन्य साहित्यिकांची कथा
- कथा लेखन (स्वरचित कथा)
- अनुदिनी (ब्लॉग-स्वलिखित व अद्ययावत)
- ललित लेख
- वैचारिक लेख
- संहिता लेखन : पथनाट्य लेखन
- संहिता लेखन : स्किट लेखन
- संहिता लेखन : एकांकिका

**भाषा प्रकार : मराठी, हिंदी, इंग्रजी (वरील सर्व साहित्य प्रकारांसाठी)**

❖ **पथनाट्य लेखनाचे विषय**

१.भारत को जानो
२.आजचा तरुण आणि व्यसन
३.दीड जिबी डाटा
४.माणसाने माणसाशी माणसासम वागणे.

❖ **प्रहसन (स्किट) लेखनाचे विषय**

१. संवेनशीलता
२.देशभक्ती
३.शिक्षणातील अनागोंदी

४.विनाकारण राजकारण

❖ **वैचारिक लेखनाचे विषय**

१.समान नागरी कायदा

२.विद्यार्थी चळवळ आणि साहित्य

३.स्वावलंबी भारत

४. शिवराज्याभिषेक - ३५०

❖ **नोंदणी शुल्क :** 300/- (सामान्य निवास व्यवस्था व भोजन व्यवस्था आयोजक करतील)

❖ **नोंदणीची अंतिम दिनांक:** 25 ऑक्टोंबर 2023

❖ **वयोमर्यादा:** 25 वर्ष

❖ **संमेलनाचे स्वरूप**

- ग्रंथदिंडी
- जाहीर उद्धाटन
- सांस्कृतिक कार्यक्रम
- महाविद्यालयीन वाङ्मय मंडळ प्रमुख, प्राध्यापकांचे एकत्रीकरण
- नाविण्यपूर्ण उपक्रमांची चर्चा
- प्रकट मुलाखत
- काव्य निर्मिती, गटनिहाय चर्चा, सादरीकरण व मार्गदर्शन कथा / वैचारिक लेख, ललित लेख, संहिता लेखन (पथनाट्य लेखन, प्रवसन लेखन) अनुदिनी लेखन (ब्लॉग)
- निवडक प्रतिनिधीचे कविसंमेलन व कथाकथन
- परिचर्चा/अभिवाचन
- समारोप व पारितोषिक वितरण

➢ **वैयक्तिक पारितोषिके :**

सर्व साहित्य प्रकारांसाठी गुणवत्तेच्या निकषावर प्रथम ३ क्रमांकांना रोख रक्कम स्मृतिचिन्हे व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र.

➢ **रोख पारितोषिक रक्कम-**

- प्रथम- 3333
- द्वितीय- 2222
- तृतीय- 1111
- उतेजनार्थ ( १ )- 555

- उत्तेजनार्थ ( २ )- 555

### ❖ उत्कृष्ट वाङ:मय मंडळ स्पर्धा

- यावर्षी प्रतिभा संगम मध्ये उत्कृष्ट वाङ:मय मंडळास ही आपण पुरस्कार देणार आहोत.
- यात महाविद्यालयात मागील वर्षी वाङ:मय मंडळाने केलेल्या पाच उपक्रमांची माहिती ची पिपीटी बनवून आणावी त्याच्या सादरीकरनासाठी आपल्याला पाच मिनिटे देण्यात येतील.
- साहित्य संमेलनात किमान वाङ:मय मंडळाचा प्रतिनिधीची उपस्थिती अनिवार्य.

### ❖ पारितोषिक

- प्रथम- 3333
- द्वितीय – 2222
- तृतीय – 1111

### ❖ राज्यस्तरीय चषक:

सर्व प्रकारातील विद्यार्थी साहित्याकांचा सहभाग, शिस्तपालन व साहित्य गुणवत्ता यांचे मूल्यमापन करून सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्याा महाविद्यालयास **सर्वोत्कृष्ट महाविद्यालय राज्यस्तरीय** चषक देण्यात येईल.

❖ ( नोंदणी करण्यासाठी वरील QR कोड स्कॅन करावा )

❖ नोंदणीसाठी लिंक - https://forms.gle/PmuaMo9WoR6MAsMb6

कळावे,

प्रसाद जाधव
राष्ट्रीय सहसंयोजक, राष्ट्रीय कला मंच

श्री दुर्गेश साठवणे
निमंत्रक, प्रतिभा संगम २०२३

संपर्क - 9527507494, 9588467310, 9665088197, 8208068853.